पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८
प्राथमिक शिक्षण विभाग
**जाहिरात क्र.०२**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना विविध मुद्यांवर समुपदेशन करणेकामी “समुपदेशक” पदे तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर ११ महिने कालावधीकरीता भरावयाचे आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

- **समुपदेशक एकूण पदे २५**

| क्र | पदनाम | दरमहा एकत्रित मानधन | एकूण पदे | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | समुपदेशक | ३०,०००/- | २५ | १. UGC मान्यताप्राप्त विद्यापीठातून क्लिनिकल / समुपदेशन मानसशास्त्रात नियमित पदव्युत्तर पदवी.<br>किंवा<br>UGC मान्यताप्राप्त विद्यापीठातून वैद्यकीय आणि मानसोपचार / कौटुंबिक आणि बालकल्याण या विषयातील स्पेशलायझेशनसह नियमित MSW (मास्टर इन सोशल वर्क).<br>किंवा<br>UGC मान्यताप्राप्त महाविद्यालयातून मानसशास्त्र (6 युनिट), सामाजिक कार्य (6 युनिट) मध्ये नियमित पदवी आणि मान्यताप्राप्त महाविद्यालयातून मार्गदर्शन आणि समुपदेशनाचा डिप्लोमा.<br>२. किशोरवयीन मुलांसोबत काम करण्याचा किमान १ वर्षाचा अनुभव<br>३.शाळा समुपदेशक म्हणून काम करण्याचा किमान १ वर्षाचा अनुभव अनुभव<br>४. प्रशिक्षण आणि कार्यशाळा | वय वर्ष ३५ पर्यंत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | आयोजित करण्याचा अनुभव<br>५. संगणक कौशल्ये तसेच मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक | |

➢ **<u>आरक्षणनिहाय पदांचा तपशील :-</u>**

| **<u>पद</u>** | **अनु. जाती** | **अनु. जमाती** | **विज - अ** | **भज-ब** | **भज-क** | **भज-ड** | **विमा-प्र** | **इमा-व** | **आ.दु.घ** | **एसई बीसी** | **खुला** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| <u>आरक्षण</u> | १३% | ७% | ३ % | २.५% | ३.५ % | २% | २% | १९ % | १०% | १०% | ३८ % | १०० % |
| <u>मंजूर</u> | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ० | ०५ | ०२ | ०२ | ०७ | २५ |

<u>अटी व शर्ती-</u>

१) एकत्रित मानधनावर नेमलेल्या समुपदेशक यांची नेमणुक ही नेमणूक आदेशाचे दिनांकापासून ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती असेल. आवश्यकतेनुसार ही मुदत दिलेल्या कालावधीपुर्वी केव्हाही संपुष्टात आणण्याचे अधिकार मा.अति.आयुक्त (१) सो. पिं.चिं.मनपा यांचा राहील. त्यानंतर सदरचा कालावधी कोणतीही पुर्वसुचना न देता आपोआप संपुष्टात येईल. त्यामुळे अर्जदारास कायमपदी नेमणुकीचा हक्क प्राप्त राहणार नाही. तसेच नेमणुकी संदर्भात न्यायालयात दाद मागणार नाही. नियुक्तीच्या वेळी सदरच्या नेमणूकीबाबतचे हमीपत्र सादर करावे लागेल.

२) ज्या दिवशी प्राथमिक शिक्षण विभागास समुपदेशक यांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशी शिवाय सदर उमेदवारांची सेवा संपृष्टात आणण्यात येईल. या संबधीचे सर्व अधिकार मा. अतिरिक्त आयुक्त (१). पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखुन ठेवले आहेत. तसेच पात्र उमेदवारांना नेमणुक देताना संख्या कमी/जास्त करण्याचा अधिकार मा.अति.आयुक्त (१) सो.पिं.चिं.मनपा यांचा राहील.

३) सदरची निवड ही समुपदेशक पदासाठी केवळ तात्पुरत्या एकत्रित मानधनावर हंगामी स्वरूपाची आहे. उमेदवारास मनपा सेवेत राहण्याचा अधिकार मागता येणार नाही. सदरचे पद हे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या करीता व आवश्यकतेनुसार राहील.

४) निवड झालेल्या उमेदवारास एकत्रित मानधना व्यतिरीक्त मनपा मार्फत देण्यात येणाऱ्या कोणत्याही सोयी सुविधा हक्क व इतर आर्थिक लाभ व भत्ते देय राहणार नाहीत. (उदा.दिवाळी बोनस तथा सानुग्रह अनुदान इ.)

५) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर तसेच नियुक्ती झाल्यानंतरही अर्जदार विहित अर्ज/पात्रता धारण न करणारा,गैरवर्तन करताना दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास संबंधिताची उमेदवारी अथवा निवड रद्द करणेत येईल,तसेच काही आक्षेप आढळल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करणेत येईल.

६) उमेदवाराने सोबत दिलेल्या नमुन्यात समुपदेशक या पदासाठी अर्ज मा.अति.आयुक्त(१),पिंपरी चिंचवड महानगरपालिका. पिंपरी १८. यांच्या नावाने करावा. सदरचा अर्ज दि. ०२/०४/२०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत **<u>समक्ष</u> जुना ड प्रभाग कार्यालय, कर्मवीर भाऊराव पाटील, मनपा प्राथमिक शाळा, पिंपरीगाव.** येथे वेळेत सादर करावा. पोस्टाद्वारे/कुरीयरद्वारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

७) विहीत मुदत काळात प्राप्त न झालेल्या अर्जाचा विचार कोणत्याही परस्थितीत करणेत येणार नाही. अर्जदाराने आपले अर्ज महापालिकेच्या जाहीरातीमध्ये विहित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारक राहील. अन्यथा अर्ज बाद केले जातील.

८) उमेदवाराने आपल्या अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, धारण केलेली शैक्षणिक अर्हता, पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रक, अनुभव प्रमाणपत्र, आधारकार्ड, आरक्षण प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्राच्या सत्य प्रती सादर करणे बंधनकारक आहे.

०९)अपुर्ण माहिती व अटींची पुर्तता न करणा-या उमेदवाराचे अर्ज बाद करून अपात्र ठरविले जातील. अपात्र अर्ज कार्यालयात जमा करणेत येतील. याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१०)शैक्षणिक अर्हतेत पात्र ठरलेल्या उमेदवारांना अनिवार्य लेखी परीक्षा द्यावी लागेल. लेखी परिक्षेसंबधित माहिती उमेदवारास मेलद्वारे अथवा दूरध्वनीद्वारे कळविणेत येईल.

११) लेखी परिक्षा उत्तीर्ण झालेनंतर उमेदवारांस कौशल्य चाचणीस (मुलाखत) उपस्थित राहणे बंधनकारक असेल. संबधित माहिती उमेदवारास मेलद्वारे अथवा दूरध्वनीद्वारे कळविणेत येईल.

१२)मुलाखतीस येण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

१३)नियुक्तीच्या वेळी उमेदवारास रक्कम रूपये ५००/- स्टॅम्प पेपरवर (नोटराईज्ड करून) मनपा सेवेत भविष्यात नोकरी बाबतचा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच न्यायालयात दाद मागणार नाही. याबाबतचे हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर (Online) पाहता येईल. जाहिरातीनुसार कार्यवाही करणे अथवा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अंतिम निर्णय मा.अति.आयुक्त (१) सो.पिं.चिं.मनपा यांचा राहील.

सही/-

अतिरिक्त आयुक्त (१)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी १८

जाहिरात क्रमांक - ०२

दिनांक – १६/०३/२०२४

क्र.शिक्षण/१६/कावि/०३/ २०२४

<u>उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना</u>

| पासपोर्ट साईज फोटो |
|---|

प्रति,
मा. अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८.

विषय – "समुपदेशक" या पदावर नेमणुक मिळणेबाबत
संदर्भ – दि. / /२०२४ च्या दै................मधील जाहिरात क्र...........

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी, एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात खालील नमूद पदाकरीता आवश्यक ती अर्हता धारन करीत असून सदरचे पदासाठी निवड होणेकामी विहित नमुन्यातील अर्ज पुढीलप्रमाणे सादर करीत आहे.

१ अर्जदाराचे संपुर्ण नाव –

२ अर्जदाराचा पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता –

३ दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक-

४ मेल आय.डी. –

५ जन्मतारिख –

६ शैक्षणिक अर्हता –

७ अनुभव –

८ जात......................प्रवर्ग...................(उदा.अ.जा/अ.ज/खुला व इतर)

मी खाली सही करणार प्रमाणित करते/करतो की, वर नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. तसेच वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे सदरची नियुक्ती तात्काळ रद्द होणेस मी पात्र राहील. तसेच माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाई केलेस माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

(आपला/आपली विश्वासू)

स्थळ- अर्जदाराची सही----------------------------------

दिनांक- अर्जदाराचे नाव-----------------------------------

सोबत सहपत्रे- अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेनुसार प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे.

टिप- शैक्षणिक व अनुभवाच्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सोबत जोडणेत याव्या.